घर बांधणी अग्रिम व्याज आकारणीबाबत
सन १ एप्रिल २००७ ते पुढील आदेशापर्यंत

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक - घबांअ-१०.०७/प्र.क्र.४६/२००७/विनियम
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २१ सप्टेंबर, २००७

## शासन निर्णय

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - घबांअ-१०.०६/प्र.क्र.७५/२००६/विनियम, दिनांक २० फेब्रुवारी, २००७ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या घर बांधणी अग्रिमाच्या प्रयोजनाकरीता व्याजाचे दर निश्चित करण्यात आले होते. केंद्र शासनाने १ एप्रिल २००७ पासून पुढील आदेशापर्यंत घर बांधणी अग्रिमाकरीता सध्याचे व्याजदर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाचे सध्याचे व्याजाचे दर लक्षात घेता पुढे दर्शविलेल्या कालावधीसाठी घर बांधणी अग्रिम नियम १९६२ ( मुंबई वित्तीय नियम - १९५९ च्या नियम १३४ मधील परिशिष्ट-२६) अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात येणाऱ्या घर बांधणी अग्रिमावरील व्याजाची परिगणना एकरुप दराने ( UNI-FORM RATES ) पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

कालावधी - सन १ एप्रिल २००७ ते पुढील आदेशापर्यंत

| | घर बांधणी अग्रिम मंजूर रक्कम | व्याजदर |
|---|---|---|
| १ | रु.५०,००० पर्यंतच्या अग्रिम रकमेवर | ५ % |
| २ | रु. १,५०,००० पर्यंतच्या अग्रिम रकमेवर | ६.५ % |
| ३ | रु. ५,००,००० पर्यंतच्या अग्रिम रकमेवर | ८.५ % |
| ४ | रु.७,५०,००० पर्यंतच्या अग्रिम रकमेवर | ९.५ % |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २००७१००५१३२०३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना.हे.सोनारे )
अवर सचिव, वित्त विभाग

प्रति
* १. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र,मुंबई ४०० ०२०
* २. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
* ३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
* ४. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
५. राज्यपालांचे सचिव

६. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
७. उप मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव
८. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
९. सर्व आमदार
१०. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव
११. अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकणभवन, नवी मुंबई
* १६. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
* १७. प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
* १८. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मुंबई
* १९. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
* २०. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* २१. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मादाम कामा रोड, मुंबई
* २२. प्रमुख न्यायाधीश, कुटुंब न्यायालय, नागपूर/मुंबई, बांद्रे, मुंबई ४०० ०५१
२३. उप संचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग,कोकण भवन, नवी मुंबई/पुणे/नागपूर/ औरंगाबाद / नाशिक / अमरावती
२४ उप मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा,कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई / पुणे/ नागपूर / औरंगाबाद / नाशिक / अमरावती
२५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२६. सर्व उप कोषागार अधिकारी
२७. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख
२८. सर्व विभागीय आयुक्त
२९. सर्व जिल्हाधिकारी
३०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३१. सर्व जिल्हा परिषदांचे अर्थ विभागातील मुख्य लेखा व वित्त अधिकारी
३२. निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली ११० ००१
३३. संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-८, स्टेट एम्पोरिया इमारत, बाबा खरकसिंग मार्ग, नवी दिल्ली ११०००१
३४. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३५. निवड नस्ती, विनियम, वित्त विभाग

* पत्राद्वारे.

------------